सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाकरीता मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सर्वसाधारण) या योजनेअंतर्गत ३४-शिष्यवृत्त्या/ विद्यावेतन या उद्दिष्टाखालील खर्चास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,
शासन निर्णय क्र. मुरोनि-२०२५/प्र.क्र.४५/उद्योग-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक २५/०३/२०२५

वाचा:- १) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, शासन निर्णय क्र. योजना-२०१९/प्र.क्र.१२१/उद्योग-७, दिनांक ०१/०८/२०१९.

२) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१७७/उद्योग-७, दिनांक ३१/०८/२०१९.

३) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, शासन निर्णय क्र.योजना-२०१९/प्र.क्र.२३०/उद्योग-७, दिनांक२३/०१/२०२०.

४) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, शासन निर्णय क्र. योजना-२०१९/ प्र.क्र.१२१/उद्योग-७, दिनांक ११/११/२०२२.

५) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३, दिनांक २५/७/२०२४, दिनांक १२/०२/२०२५ व दिनांक १७/०३/२०२५.

६) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.आयएलई-२०२३/प्र.क्र.१४२/प्रशासन-३, दिनांक २४/०७/२०२३.

७) उद्योग सह संचालक (मुरोनिका), उद्योग संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.उसं/ मुंरोनिका/ Gen/ ले.नि.वि./ शिष्यवृत्ती/२०२३-२४/A-१३८, दिनांक १४/०२/२०२५

८) उद्योग सह संचालक (मुरोनिका), उद्योग संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.उसं/ मुंरोनिका/ Gen/ ले.नि.वि./ शिष्यवृत्ती/२०२३-२४/A-२२३, दिनांक ०५/०३/२०२५.

९) उद्योग सह संचालक (मुरोनिका), उद्योग संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.उसं/ मुंरोनिका/Gen/ ले.नि.वि./ शिष्यवृत्ती/२०२३-२४/A-२६८, दिनांक १२/०३/२०२५.

प्रस्तावना:-

राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रात स्वयंरोजगार व रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होत आहेत. या स्वयंरोजगार व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशिलतेला कालानुरुप वाव देणारी 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम' (CMEGP) ही सर्वसमावेशक योजना दिनांक ०१/०८/२०१९ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी उद्योग विभागाच्या अधिपत्याखालील उद्योग संचालनालयाच्या अंतर्गत कार्यरत जिल्हा उद्योग केंद्र तसेच खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचेअंतर्गत कार्यरत जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय यांच्यामार्फत पूर्णतः ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे.

२. CMEGP योजनेअंतर्गत लाभार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याकरीता महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED) व MITCON Consultancy & Engineering Services Limited या प्रशिक्षण संस्थांना मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार उद्योग संचालनालयाकडून दिनांक १४/०२/२०२५, दिनांक ०५/०३/२०२५ व दिनांक १२/०३/२०२५ रोजीच्या पत्रांन्वये प्रस्तावित केल्यानुसार, सदर योजनेंतर्गत MCED व MITCON Consultancy & Engineering Services Limited या प्रशिक्षण संस्थेमार्फत बँकेद्वारे मंजूर केलेल्या कर्ज प्रकरणांतील लाभार्थ्यांना सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ऑफलाईन प्रशिक्षण दिलेले परंतु प्रशिक्षण खर्च अदा करण्यासाठी प्रलंबित असलेले व सन २०२४-२५ या चालू आर्थिक वर्षात बँकेद्वारे मंजूर कर्ज प्रकरणातील लाभार्थ्यांवरील ऑफलाईन प्रशिक्षणावर झालेल्या खर्चाकरीता MCED या प्रशिक्षण संस्थेकरीता रुपये ७,९५,०६,०००/- व MITCON Consultancy &

Engineering Services Limited या प्रशिक्षण संस्थेकरीता १,८६,१५,०००/- असा एकूण रुपये ९,८१,२१,०००/- इतक्या निधीची आवश्यकता आहे.

३. उद्योग संचालनालयाकडून MCED व MITCON Consultancy & Engineering Services Limited या प्रशिक्षण संस्थांकरीता करण्यात आलेली निधीची मागणी तसेच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये CMEGP योजनेंतर्गत ३४-शिष्यवृत्त्या/विद्यावेतने या उद्दिष्टाखाली बीम्स प्रणालीवर उपलब्ध तरतूद लक्षात घेता, MCED या संस्थेकरीता रुपये ३,२४,१२,०००/- आणि MITCON Consultancy & Engineering Services Limited या संस्थेकरीता रुपये ७५,८८,०००/- असा एकूण रुपये ४ कोटी एवढ्या निधीच्या खर्चास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेअंतर्गत सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात प्रशिक्षण कार्यक्रमावरील खर्चाकरीता महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED) या संस्थेकरीता रुपये ३,२४,१२,०००/- (अक्षरी तीन कोटी चोवीस लक्ष बारा हजार फक्त) व MITCON Consultancy & Engineering Services Limited या संस्थेकरीता रुपये ७५,८८,०००/- (अक्षरी पंचाहत्तर लक्ष अठ्ठ्याऐंशी हजार फक्त) अशा एकूण रुपये ४,००,००,०००/- (अक्षरी चार कोटी रुपये फक्त) एवढ्या खर्चास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर रुपये ४,००,००,०००/- (अक्षरी चार कोटी रुपये फक्त) इतकी रक्कम वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED) व MITCON Consultancy & Engineering Services Limited या प्रशिक्षण संस्थांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरणाची जबाबदारी ही विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांच्या कार्यालयातील लेखा अधिकारी यांची राहील.

३. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३, दिनांक २५ जुलै, २०२४ व त्यासोबतच्या परिशिष्टातील तरतुदीनुसार तसेच त्याअनुषंगाने उद्योग संचालनालयाकडून प्राप्त माहितीनुसार असे प्रमाणित करण्यात येते की,

a) मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाची राज्यामध्ये अंमलबजावणी करणेबाबत दिनांक ०१/०८/२०१९ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून यामध्ये अर्ज प्रक्रिया व प्रकल्प मंजूरी अंतर्गत करावयाची कार्यवाही, योजनेची अंमलबजावणी यंत्रणा, अनुदान वितरण व विविध मंजूरीस्तव समिती यांची माहिती दिलेली आहे. तसेच दिनांक ११/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत उत्कृष्ट उपलब्धी होणेच्या दृष्टीने कर्ज प्रस्ताव मंजूर झालेल्या प्रकरणामध्ये लाभार्थींचे दोन आठवडे कालावधीचे निवासी उद्योजकीय प्रशिक्षण अनिवार्य असून यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण करणा-या अर्जदारांनाच कर्ज वितरण व अनुदान सहाय्य वितरणासाठी पात्र ठरविण्यात येते. सदर प्रशिक्षणासाठीचा खर्च योजनेसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येतो.

b) यापूर्वी सदर योजनेअंतर्गत प्राप्त झालेला निधी प्राधिकृत बँकेत जमा करण्यात येवून सदर निधी बँकेमार्फत लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येत आहे.

c) यापूर्वी वितरीत केलेल्या ७५ टक्केपेक्षा अधिक निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

d) वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक/महालेखापाल यांच्याकडून कोणतेही आक्षेप नाहीत.

e) सदर निधी स्वीय प्रपंची लेखा अथवा बँक खात्यात जमा न करता खर्च केला जाणार आहे.

४. सदर प्रयोजनार्थ होणारा खर्च "मागणी क्र.के-७, २८५१-ग्रामोद्योग व लघु उद्योग, १०२-लघु उद्योग, (००) (२५) मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (कार्यक्रम) (२८५१ ६६४५), ३४- शिष्यवृत्त्या/विद्यावेतने" या लेखाशिर्षाखालील सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात येईल. तसेच सदर प्रयोजनार्थ होणारा प्रत्यक्ष खर्च निधी वितरणाच्या अधीन राहून करण्याची दक्षता घेण्यात येईल.

५. सदर शासन निर्णय प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून सचिव (उद्योग) यांना दिनांक २४/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारांतर्गत निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२५०३२५१३०८३१८७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by AJIT TUKARAM SASULKAR
Date: 2025.03.25 16:15:48 +05'30'

(अजित सासुलकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई-३२.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई-९३.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मुंबई.
७. लेखा अधिकारी, उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई.
८. सर्व विभागीय उद्योग सह संचालक (उद्योग संचालनालयामार्फत)
९. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (उद्योग संचालनालयामार्फत).
१०. वित्त विभाग (कार्यासन व्यय-१६), मंत्रालय, मुंबई -३२.
११. नियोजन विभाग (कार्यासन १४६१), मंत्रालय, मुंबई-३२.
१२. कार्यासन अधिकारी (प्रशासन-१), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवड नस्ती (उद्योग-७).